पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक ०१/०५/२०१९

## महाराष्ट्र दिनी पोलीस महासंचालक पदक प्राप्त पोलीसांचा सन्मानसोहळा पार पडला

आज रोजी महाराष्ट्र दिनी पोलीस अधिक्षक, कार्यालय गडचिरोली येथे मा. पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे साो. यांच्या हस्ते सकाळी ०७:०० वा. ध्वजारोहण कार्यक्रम पार पडला.

गडचिरोली जिल्ह्यातील १०२ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या उल्लेखनिय व प्रशंसनिय कामगिरीसाठी नुकतेच मा. पोलीस महासंचालक यांचे पदक जाहीर करण्यात आले होते. या सर्व पदकप्राप्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना मा. पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे साो. यांच्या हस्ते पोलीस महासंचालक पदक, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देवुन सन्मानित करण्यात आले.

दिवंगत सहायक पोलीस निरीक्षक योगेश गुजर यांना देखील त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीकरिता मा. पोलीस महासंचालकांचे पदक जाहीर झाले होते. यावेळी त्यांचे पदक त्यांच्या कुटुंबीयांनी स्विकारले. त्याचबरोबर सत्र क्र. ११३ बॅचच्या अधिकाऱ्यांनी यावेळी जमा केलेला २३,७३,००० रु.चा मदतनिधी श्री. शैलेश बलकवडे साो. यांच्या हस्ते योगेश गुजर यांच्या कुटुंबीयांकडे सुपुर्द करण्यात आला.

यावेळी मोठ्या संख्येने पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

